जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2024
सकाळ



कोल्हापूर : 'नव्यता' ग्रॅज्युएशन फॅशन शो प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे स्वागत प्राचार्य डॉ. ए. आर. कुलकर्णी यांनी केले. शेजारी रितू चौधरी, सुमैय्या पठाण, ज्योती हिरेमठ, प्रज्ञा कापडी, आदी उपस्थित होते.

# महिला महाविद्यालयात रंगला 'नव्यता' फॅशन शो

कोल्हापूर, ता. २१ : येथील सायबर संचालित कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमेन महाविद्यालयातील फॅशन डिझाईन विभागातर्फे 'नव्यता' ग्रॅज्युएशन फॅशन शो उत्साहात झाला.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. फ्रिलान्स डिझायनर रितू चौधरी, सुमैय्या पठाण या ज्युरी मेंबर्स होत्या. फॅशन डिझाईन विभाग प्रमुख ज्योती हिरेमठ यांनी महाविद्यालय, कार्यक्रमाची माहिती दिली. प्रज्ञा कापडी यांनी उपस्थितांची ओळख करून दिली. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी असलेल्या कार्यक्रमाचे कौतुक केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. आर. कुलकर्णी होते. यावेळी तृतीय वर्षातील विद्यार्थिनींच्या गारमेंट्सचा ग्रॅज्युएशन शो करण्यात आला. यासाठी विद्यार्थिनींनी पटोला, इकत, राजस्थानी, ब्राईडमेड, बटरफ्लाय अशा पाच वेगवेगळ्या संकल्पना वापरून सुंदर गारमेंट्स तयार केले होते. तृतीय वर्षातील विद्यार्थिनींच्या गारमेंट्सचा फॅशन शो आणि त्यांची प्रश्नोत्तरासह स्पर्धा घेतली. त्यामध्ये स्पार्कलिंग इबोनी पटोला विजेता ग्रुप ठरला. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनींनी त्यांनी डिझाईन केलेल्या गारमेंट्सचा फॅशन शोचे सादरीकरण केले. श्रुती गवळी यांनी सूत्रसंचालन केले. अर्चना पाटील यांनी आभार मानले. सारिका भोकरे यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 MAR 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात 'युवा संवाद' कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'युवा संवाद भारत@ २०४७' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

राजर्षी शाहू सभागृहात आयोजित कार्यशाळेत शहरातील विविध महाविद्यालयांतून प्रातिनिधिक विद्यार्थ्यांसह विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि अन्य अधिविभागांतील विद्यार्थी सहभागी झाले. उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

कार्यशाळेतअधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. अविनाश भाले यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक अमोल कुलकर्णी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उद्या रंगणार 'शिव-महोत्सव'

## चंद्रकुमार नलगे यांना 'शिव-जीवनगौरव'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'माणसातला कलाकार शोधणारा महोत्सव' म्हणून कोल्हापूरच्या सांस्कृतिक जीवनात वेगळी ओळख निर्माण केलेला 'शिव महोत्सव' उद्या, शनिवारी सायंकाळी ४ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात होणार आहे. यंदाचा शिव-जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. चंद्रकुमार नलगे यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ आजी-माजी स्नेहमेळावा कृती समितीचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर, मुख्य समन्वयक अभिजित राऊत, सहसमन्वयक अजिंक्य शिंदे यांनी दिली आहे.

राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माजी पोलिस आयुक्त गुलाबराव पोळ, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, गृह विभागाचे उपसचिव विजय पोवार यांची प्रमुख उपस्थिती असेल.

प्रख्यात निवेदक डॉ. सत्यजित कोसंबी हे कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत. यावेळी शैक्षणिक, प्रशासकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना शिव-गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

### उत्कर्ष शिंदे, अक्षता सावंत, चंदगडकर यांचे सादरीकरण

सुप्रसिद्ध गायक व संगीतकार डॉ. उत्कर्ष आनंद शिंदे यांच्यासह 'झी मराठी सारेगमप'फेम अक्षता सावंत आणि 'कलर्स मराठी सूर नवा ध्यास नवा'फेम सागर चंदगडकर यांचे सादरीकरण होणार आहे. लोकशाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे, नृत्यदिग्दर्शक सागर बगाडे, नृत्यदिग्दर्शक ओंकार शेट्ये, सँड आर्टिस्ट अमित माळकरी यांचेही सादरीकरण महोत्सवात होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परिक्षा सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल महिन्यातील उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. आज Bachelor of Arts (Dress Making and Fashion), Bachelor of Science (Food Technology and Management) या दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षांसाठी एकूण १७ विद्यार्थी उपस्थित होते. गैरप्रकार करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षांना सुरुवात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांना गुरुवारी सुरुवात झाली. पहिल्या दिवशी बी.ए. (ड्रेस मेकिंग अँड फॅशन कोऑर्डिनेशन बॅचलर ऑफ सायन्स, फूड टेक्नॉलॉजी अॅण्ड मॅनेजमेंट ) या दोन अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध महाविद्यालयामध्य झाल्या. या परीक्षांसाठी एकूण ९७ विद्यार्थी उपस्थित होते.

22 MAR 2024 महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाटील अभियांत्रिकीतर्फे शनिवारी 'अर्थ अवर'चे आयोजन

कोल्हापूर,ता.२०(प्रतिनिधी)-

..................................

येथील डी.वाय.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व अॅडवेंचर क्लबच्यावतीने शनिवार ता.२३ मार्च रोजी 'अर्थ अवर' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिवशी रात्री १ तास विजेची उपकरणे बंद ठेवून वीज बचत व पर्यावरण रक्षणाच्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर महानगरपालिका यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवला जात आहे. याबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य डॉ. संतोष चेडे यांनी सांगितले, कि वर्ल्ड वाईड फंड (डब्लूडब्लूएफ) या जागतिक स्तरावर कार्यरत एन.जी.ओ. कडून जगभरात ता.२३ मार्च रोजी 'अर्थ अवर'चे आयोजन केले जाते. वाढत्या तापमानामुळे जो असमतोल निर्माण झाला आहे त्याला काही अशी आळा घालण्यासाठी हा उपक्रम आहे.

उपक्रमाचे समन्वयक प्रा.योगेश चौगुले व डीन स्टुडंट्स अफेअर डॉ.राहुल पाटील म्हणाले कि, शनिवारी कोल्हापूर शहरातील आय.आर.बी. अंतर्गत बल्ब हायमास्ट दिवे व एल.ई.डी. असे ३०,००० हुन अधिक स्ट्रीट लाईट्स सायंकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत बंद राहणार आहेत. नागरिकांनीही या कालावधीत लाईट व अनावश्यक विद्युत उपकरणे बंद ठेऊन या उपक्रमात सहभागी व्हावे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा.योगेश चौगुले, डॉ. राहुल पाटील, तुषार आळवेकर व विद्यार्थी विशेष परिश्रम घेत आहेत. तरी नागरिकांनी उर्जाबचत व पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2024

लोकमत

# बेसबॉल स्पर्धेसाठी प्रज्ञा पाटीलची निवड



कळंबा : शिवाजी विद्यापीठांतर्गत महावीर कॉलेज कोल्हापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या ऑल इंडिया बेसबॉल निवड स्पर्धेतून साळोखेनगर येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची विद्यार्थिनी प्रज्ञा जोतीराम पाटील हिची बारामती येथे होणाऱ्या ऑल इंडिया बेसबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठात संघात निवड करण्यात आली. तिला संस्था अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, तेजस पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. अभिजित माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने, प्रा. सुयोग पाटील यांचे प्रोत्साहन, तर महाविद्यालयाचे फिजिकल डायरेक्टर प्रा. सचिन पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAR 2024
क्रांतीसिंह

# डॉ.सकट यांच्या सामाजिक कार्याचा विद्यापीठाला अभिमान

कोल्हापूर(प्रतिनिधी):-प्रामाणिक आणि जबाबदारीने कामे करणारे विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ.उत्तम सकट यांच्या सामाजिक कार्याचा विद्यापीठाला अभिमान आहे, असे कौतुकोद्गार डॉ.दिगंबर शिर्के यांनी काढले. डॉ.सकट यांना महाराष्ट्र शासनाचा २०२२-२३ साठीचा साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रशासनाच्यावतीने विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. कुलगुरू डा.शिर्के पुढे म्हणाले, डॉ.सकट विद्यापीठाच्या लोकविकास केंद, वाहन विभाग, लेखा विभागामध्ये उत्तम कामगिरी केलेली आहे. कार्यालयीन जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत सामाजिक जाणीव ठेवून पीएच.डी.संशोधनासाठी केलेल्या प्रबंधाचे पुढे समाजासाठी उपयोग होणे आणि त्याची दखल शासन पातळीवर घेतली जाणे, हे निश्चित विद्यापीठासाठी भूषणाव आहे. त्यांचे सामाजिक कार्य सर्वांसाठी आदर्शवत असे आहे. यावेळी, कुलसचिव डॉ.विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.